दिनांकः २४/०१/२०२१

प्रति,
पालक [इयत्ता ५ वी ते ८ वी]

**संदर्भ : इयत्ता पाचवी ते आठवीची चे वर्ग प्रत्यक्ष सुरू करणेबाबत...**

खूप दिवसांपासून आपण ज्या क्षणाची वाट पाहत होतो तो क्षण जवळ येत आहे. तो क्षण म्हणजे प्रत्यक्ष शाळा / वर्ग सुरू करण्यासंदर्भात. या संदर्भातील बातम्या आपणही ऐकत असालच. याअन्वये आपण इयत्ता पाचवी पासूनचे वर्ग प्रत्यक्षरित्या सुरू करू शकतो. यासंदर्भात स्थानिक पातळीवरील झालेल्या शिक्षणविभागाच्या बैठकीत आपल्या शाळेतील प्रतिनिधी उपस्थित होते ज्यात दिनांक २७ जानेवारी पासून शाळा सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे.

❖ **सदर बैठकीत चर्चा झालेले काही महत्त्वाचे मुद्दे -**

- इयत्ता पाचवी ते आठवीच्या शिक्षकांना आरटी-पीसीआर चाचणी बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांसाठी ती बंधनकारक नाही.
- शाळा व पालकवर्ग यांचेकडून स्वच्छता, सुरक्षा व सामाजिक दूरी यांचे काटेकोर पालन होणे गरजेचे.
- वाहतूक व्यवस्थेशी संबंधित मार्गदर्शक तत्वांचे पालन करून शाळा बस वाहतूक करू शकेल. ही सुविधा ऐच्छिक स्वरूपाची असेल.
- यासंदर्भात पालकांकडून लेखी स्वरूपात संमती घेणे आवश्यक.

याच पार्श्वभूमीवर आपल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रत्यक्ष शाळा सुरू करण्यासंदर्भातील तयारी जसेः वर्गखोल्या तयार करणे, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र्य व कायमची जागा ठरवणे. सामाजिक अंतर / दूरी कशी राखली जाईल, शाळेत प्रवेश करताना व बाहेर पडताना घ्यायची काळजी, शाळेचे निर्जंतुकीकरण इत्यादी गोष्टीवर नियोजन करत आहेत.

❖ **यासंदर्भातील काही महत्वाच्या तारखा व माहिती**

- आपल्या शाळेचे इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्ग मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ पासून सुरू होतील.
- सोमवार, दिनांक २५ जानेवारी रोजी सकाळी ०९:०० वाजता यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी व माहिती देण्यासाठी शिक्षक व पालकांची सभा ऑनलाईन पद्धतीने होईल. त्यामुळे आपल्या मनातील शंका व प्रश्न यांचे निरसनही त्याठिकाणी होईल.
- या परिपत्रकाबरोबरच काल आपल्याला एक गुगल फॉर्म स्वरूपातील एक संमती अर्ज पाठवण्यात आला आहे तो सोमवार दिनांक २५ च्या संध्याकाळ पर्यंत भरूणे बंधनकारक आहे.

- बुधवार दिनांक २७ जानेवारी रोजी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एका मार्गदर्शक सत्राचे आजोजन करण्यात येईल ज्याद्वारे त्यांना प्रत्यक्ष शाळा सुरू होताना घ्यावयाची काळजी व पाळावयाचे नियम यासंदर्भात सविस्तर माहिती दिली जाईल.
- शासकिय मार्गदर्शक तत्त्वांनुसार दिनांक २८ व २९ जानेवारी रोजी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आरटी-पीसीआर चाचणी होईल.
- दिनांक ३० जानेवारी रोजी शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांसाठी प्रत्यक्ष शाळा सुरू होण्यासंदर्भातील नियोजन पाहण्यासाठी तशी रंगीत तालिम हाईल.
- दिनांक ०१ फेब्रुवारी रोजी शाळेची संपूर्ण स्वच्छता व निर्जंतुकीकरण होईल.
- शिक्षक व पालक सभेत सांगितलेल्या नियोजनाप्रमाणे दिनांक २ फेब्रुवारी रोजी इयत्ता पाचवी ते आठवीचे प्रत्यक्ष वर्ग सुरू होतील.
- शाळा प्रत्यक्ष स्वरूपात व ऑनलाईन स्वरूपात अशी दोन्ही प्रकारे सुरू राहिल.
- विद्यार्थ्यांना शाळेत पाठवण्याचा वा न पाठवण्याचा निर्णय सर्वस्वी पालकांचा असेल. त्याबाबत कोणतेही बंधन नसेल.

राज्य शासनाच्या व स्थानिक प्रशासन यांच्या भौतिक स्वरूपात म्हणजेच प्रत्यक्ष शाळा सुरु करण्याच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो आणि आम्ही आपणास सुनिश्चित करू इच्छितो की शाळा सुरू करण्यासाठीचे नियोजन करण्यात त्याची योग्य प्रकारे अंमलबजाणी करण्यात आम्ही शाळा म्हणून सक्षम आहोत व त्यासंदर्भातील सविस्तर माहिती देण्याचे काम ऑनलाईन स्वरूपातील पालकसभेत होईल त्यामुळे आपल्या दृष्टीने ही पालकसभा अत्यंत महत्त्वाची आहे व आशा बाळगतो की पालकभेला इयत्ता पाचवी चे आठवीचे पालक शंभर टक्के उपस्थिती दर्शवतील.

२ फेब्रुवारी पासून सुरू होणारी भौतिक स्वरूपातील शाळा कशी असेल याची माहिती घेण्यासाठी व चर्चा करण्यासाठी खाली दिलेल्या लिंक चा वापर करून आपण पालकसभेत सहभागी होऊ शकता.

**पालकसभेची वेळ व दिनांक**
दिनांकः सोमवार, २५ जानेवारी, २०२१
वेळः सकाळी ०९:०० वा.
Google Meet Link- https://meet.google.com/uts-wcqq-sye

धन्यवाद!

आपली विश्वासू,

सौ. मोनिका जयस्वाल
मुख्याध्यापिका
सर्वंकष विद्यामंदिर, रत्नागिरी.